# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०३८२, २२६४११५०/५१ फॅक्स नं.२२६९२१०२

तार- EDUTECH E_mail desk14@dte.org.in internet - http://www.dte.org.in


**कालमर्यादित**

दि. १७.१.२०१२

क्र. १४/अंलेप/आढावा बैठक/२०१२/ ३५०

दिनांक : 13 जनवरी JAN 2012

प्रति,

१. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, अमरावती, औरंगाबाद, नागपूर.

२. प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतने,

३. प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,
कराड, जळगांव, चंद्रपूर, अमरावती, औरंगाबाद.

४. प्राचार्य,
शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय,
कराड, अमरावती, औरंगाबाद.

५. संचालक,
अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे.

६. प्राचार्य,
हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी, पुणे / नागपूर.

विषय :- **दि. २३ जानेवारी, २०१२ रोजीच्या आढावा बैठकीबाबत**

संदर्भ :- क्र. १/आढावा बैठक/२०१२/०४, दि. १०.०१.२०१२

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत संदर्भांकित पत्राचे अवलोकन करावे. सुलभ संदर्भासाठी पत्राची प्रत जोडलेली आहे.

तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत विविध विषयाबाबतची सद्यस्थिती व कामाच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी मा. सहसंचालकांनी दि. २३ जानेवारी, २०१२ रोजी सकाळी ११.३० वा. संचालनालयात बैठकीचे आयोजन केलेले आहे. सदर बैठकीत विविध विषयाबाबतच्या कामकाजाचा आढावा घेण्यात येणार आहे. तरी सदर बैठकीसाठी तयार करण्यात आलेल्या विषयसूचीतील अनुक्रमांक १७ ग्रंथालय व भांडाराची अंतर्गत पडताळणी व अनुक्रमांक १८ लेखा व भांडार परिच्छेद अनुपालनाबाबत मागील तिमाहित केलेल्या कार्यवाहीचा अहवाल हे विषय या कार्यासनाशी संबंधित आहेत. तरी सदर विषयाबाबतची अद्ययावत माहिती योग्य त्या कागदपत्रासह व सोबतच्या विवरणपत्रात याबाबतची माहिती भरुन दि.१७.१.२०१२ रोजी अथवा तत्पूर्वी या संचालनालयास संबंधित विषयाशी संबंधित असलेल्या अधिकारी / कर्मचा-यांमार्फत पाठवावी.



Created with nitroPDF professional
download the free trial online at nitropdf.com/professional

ग्रंथालय व भांडाराची अंतर्गत पडताळणी विषयाबाबत पुस्तक पडताळणीबाबत केलेली कार्यवाही ग्रंथालय पडताळणीचा अहवाल, गहाळ, फाटलेल्या, जीर्ण झालेल्या पुस्तकाबाबत संस्थेने केलेली कार्यवाही, गहाळ पुस्तकाबाबत वसूल करण्यात आलेली रक्कम व शासनास जमा केलेल्या रकमेची पोचपावती (चलन प्रत) इ. जोडण्यात यावी. त्याचप्रमाणे भांडार पडताळणीबाबत, लेखा व कोषागारे कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या भांडार पडताळणी अहवालाची प्रत, भांडार आक्षेपाबाबत केलेली कार्यवाही व अनुपालन अहवालाची प्रत सादर करावी. तसेच भांडार अंतर्गत येणा-या विविध विभाग जसे प्लंबिंग, कारपेंटरी, ब्लॅकस्मिथ अशा विविध कर्मशाळांची प्रत्यक्ष पडताळणी केल्याच अहवालाची प्रत देखील सादर करावी.

तसेच अनुक्रमांक १८ लेखा परिच्छेदाबाबत महालेखाकार कार्यालयाने निर्गमित केलेल्या लेखा अहवालाची प्रत, लेखा आक्षेपाबाबत संस्थेने केलेली कार्यवाही, संबंधित कागदपत्रे, अनुपालन अहवाल, लेखा आक्षेप महालेखाकार कार्यालय, मुंबई यांनी वगळला असल्यास महालेखाकार कार्यालय, मुंबई यांचेकडून प्रापत झालेले पत्र इ. माहिती सादर करण्यात यावी.

तसेच सदर विषयास अनुसरुन विवरणपत्र तयार केलेली आहेत. त्यामध्ये माहिती भरुन सादर करण्यात यावी.

आपली,

सोबत :- विवरणपत्र 'अ' 'ब' 'क' व 'ड'

(सही) ३१।११

( ए. सी. अत्तार )
प्र. उपसंचालक,
तंत्रशिक्षण, म.रा., मुंबई

पृ. क्र. विकाअ/लेखा/२०१२/ ११७
सहसंचालक तंत्र शिक्षण,
विभागीय कार्यालय अमरावती
दि.१८/१/२०१२

प्रत:- प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती.
प्राचार्य, शासकीय औ.नि.शास्त्र महाविद्यालय, अमरावती
प्राचार्य, शासकीय तंत्र निकेतन, अमरावती/खामगांव/वाशिम/यवतमाळ/
शा.नि.म.तं.नि.यवतमाळ

त्यांना सुचीत करण्यात येते की, संचालनालयाचे पत्रांत नमूद केल्यानुसार दि.२३.१.२०१२ रोजी ~~बैठकी~~ आढावा बैठकीकरीता सोबत जोडलेले प्रपत्रातील माहिती आवश्यक त्या कागदपत्रासह या कार्यालयास दि.१८.१.२०१२ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत सादर करावी.

सहपत्र :- प्रपत्र अ, ब, क, ड

(सही)
सहसंचालक तंत्र शिक्षण
अमरावती

Created with nitro PDF professional
download the free trial online at nitropdf.com/professional

D:\Vitta\Expenditure\RO\Dte.doc

विवरणपत्र "अ" (लेखा आक्षेप)

**महालेखाकार कार्यालयाने क्रलेल्या लेखा परिक्षणातील प्रलंबित लेखा परिच्छेदांची माहिती**

विभागाचे नांव :-

| अ.क्र. | संस्थेचे नांव | जुने प्रलंबित परिच्छेद | नविन प्रलंबित परिच्छेद | एकूण प्रलंबित परिच्छेद | वरिष्ठ कार्यालयास सादर केलेले लेखा आक्षेप | महालेखाकार कार्यालयास सादर केलेले लेखा आक्षेप | महालेखाकार कार्यालयाकडून निकाली निघालेले आक्षेप | सद्यस्थितीत प्रलंबित असलेले आक्षेप | तिमाहित लेखा आक्षेपाबाबत केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | | | | | | |

विवरणपत्र "ब" (भांडार लेखा आक्षेप)

**सहसंचालक, लेखा व कोषागारे यांचे कार्यालयातील भांडार पडताळणी पथकाने केलेल्या भांडार पडताळणीतील प्रलंबित परिच्छेदांची माहिती**

विभागाचे नांव :-

| अ.क्र. | संस्थेचे नांव | जुने प्रलंबित परिच्छेद | नविन प्रलंबित परिच्छेद | एकूण प्रलंबित परिच्छेद | वरिष्ठ कार्यालयास सादर केलेले लेखा आक्षेप | लेखा व कोषागारे कार्यालयास सादर केलेले लेखा आक्षेप | लेखा व कोषागारे कार्यालयाकडून निकाली निघालेले आक्षेप | सद्यस्थितीत प्रलंबित असलेले आक्षेप | तिमाहित लेखा आक्षेपाबाबत केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | | | | | | |

Created with nitro PDF professional
download the free trial online at nitropdf.com/professional

## विवरणपत्र "क" (लेखा आक्षेप)

संस्थेचे नांव :-

| अ.क्र. | वर्ष | कालावधी | आक्षेप क्रमांक | आक्षेपाचा तपशिल | आक्षेप प्रकरणी केलेली कार्यवाही | सदरचा आक्षेप वरिष्ठ कार्यालयास / महाविद्यालयास सादर केलेला आहे काय असल्यास तपशिल | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |

## विवरणपत्र "ड" (भांडार लेखा आक्षेप)

संस्थेचे नांव :-

| अ.क्र. | वर्ष | कालावधी | आक्षेप क्रमांक | आक्षेपाचा तपशिल | आक्षेप प्रकरणी केलेली कार्यवाही | सदरचा आक्षेप वरिष्ठ कार्यालयास / महाविद्यालयास सादर केलेला आहे काय असल्यास तपशिल | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |



Created with nitroPDF professional
download the free trial online at nitropdf.com/professional